# <u>मळा</u>

हाताला मेंदी डोईला बिंदी बाईल  अशी आली घरात
वयात आल्यापासून वयस्क झाली तरी आहे राबत ||१||

रामरगाडा संसाराचा आली ओढत सतत हसत
केली ना कागाळी मिळाले ना कधी रेशमी लुगडे डाग ||२||

वावरली शेतात संगे संगही केला बाजल्यात सुखे
बहरून आली होता मुले दिला धीरही पडता सूखे ||३||

फळला फुलला मळा येता हाताशी पोरे बाळे सूनाही
विठू कृपेने तुझ्या संगती फळले फुलले माझे भाग्यही ||४||

– नारायण
०८/०७/२३